# प्रकरण सातवे

# सारांश, निष्कर्ष आणि धोरणात्मक उपाय

**प्रस्तावना :**

जगातील सर्व देशामध्ये आदिवासी जमाती असल्याचे दिसून येते. तेथील वातावरणाचा परिणाम त्यांच्या राहणीमानावर, खाण्यापिण्यावर व जीवन जगण्याच्या पद्धतीवर होत असतो. असे असले तरी सर्व आदिवासी जमाती निसर्गाच्या सान्निध्यात राहत असल्यामुळे ते निसर्गाचे लेकरे आहेत. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीत बरेचसे फरक असल्याचे आढळून आले आहे. भारतात वास्तव्य करून राहणारे एकूण ४६१ आदिवासी जमाती असून महाराष्ट्र राज्यात एकूण ४७ आदिवासी जमाती आहेत. आदिवासींना Aboriganois म्हणजे अगदी मुळचे रहिवासी, वनवासी, प्राचीन किंवा आदिवासी म्हटले आहे.

आदिवासी ही जात नसून एक जमात आहे. आदिवासींचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी अनेक अभ्यासकांनी निरनिराळ्या व्याख्या केल्या आहेत. सर्व आदिवासी जमातींचा एकाच वेळी अभ्यास करणे शक्य नाही. आदिवासी जमातीचे क्षेत्र व संख्या व्यापक स्वरूपाचे जवळजवळ सारखेच आहे. भारतात वेगवेगळ्या राज्यात दिसून येणाऱ्या आदिवासी जमातीची वैशिष्ट्याचे प्रमाण कमी अधिक असल्याचे आढळून येते. त्यामुळे भारतातील सर्वच भागातील आदिवासीमध्ये वैशिष्टपूर्ण वेगळेपण पहावयास मिळते. त्यामध्ये बोली भाषा, वंश, संस्कृती आणि आर्थिक स्थिती या सर्वच बाबतीत भारतामध्ये असलेले सर्वच आदिवासी एकाच पातळीवर असल्याचे निदर्शनास येत नाही. ज्या आदिवासींना आर्थिक सुधारणा, शिक्षण इत्यादींचा लाभ झाला. त्यांचे वेगवेगळेपण लक्षात येते. या सर्व कारणांमुळे विविध राज्यातील आदिवासी जमातींचे प्रश्न वेगवेगळ्या स्वरूपाचे असल्याचे दिसते.

सर्वसाधारणपणे भारतातील आदिवासींच्या समस्याचे दोन प्रकारामध्ये विभागणी करण्यात आली असून एक समस्या त्यांच्या पारंपरिक पद्धतीने निर्माण झालेली आणि दुसरी म्हणजे इतर संस्कृतीच्या संपर्काने निर्माण झालेली समस्या आहे. यामुळे आदिवासींच्या समस्या साधारण वाटत असल्या तरी तेवढ्या त्या साध्या नसून त्याचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आहेत. या समस्यांचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक तसेच आरोग्य संबंधित समस्या अशा वर्गात विभागणी करता येईल. या समाजाची गरज लक्षात घेता ठक्कर बाप्पा यांनी असे मत मांडले की, किती तरी दशके दुर्लक्षित असलेल्या भारतामधील आदिवासींच्या समस्याकडे तत्कालीन लक्ष देणे गरजेचे आहे. आदिवासींना इतर सुधारित समाजाबरोबर आणण्यासाठी आदिवासींची सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये वेगाने प्रगती करावी जेणेकरून त्यांचा विकास होईल. महाराष्ट्र राज्यातील असलेल्या सर्व आदिवासी जमातींच्या समस्या देशामधील इतर भागात असणाऱ्या आदिवासी सारखीच आहेत. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक त्यांची परिस्थिती सारखीच आहेत. ज्यामध्ये पिण्याचे पाणी, शौचालय, आरोग्य सुविधा, शैक्षणिक सुविधा कमी उत्पन्न इत्यादींचा अभाव प्रामुख्याने दिसून येतो. महाराष्ट्रातील आदिवासी हे देशातील आदिवासी प्रमाणे मागासलेले असल्याचे दिसून येते. आदिवासींमध्ये असलेले साक्षरतेचे प्रमाण जवळपास कमी आहे जवळजवळ ४० टक्के आदिवासी हे शेतमजूर असून ५० टक्के आदिवासी हे शेतकरी आहे. याशिवाय आदिवासी हे झाडे तोडून, लाकुड गोळा करणे, जंगलात असलेल्या वस्तू जमा करणे, गवताची कापणी करणे, चटया तसेच टोपल्या तयार करणे, तेंदूची पाने, मोहाची फुले गोळा करणे इत्यादी सारखी जंगलाच्या संबंधित कार्ये देखील पार पाडले जातात. त्याचप्रमाणे परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाशी स्थिती देखील राज्याच्या इतर जिल्ह्यातील आदिवासी समाजासारखीच आहे. परभणी जिल्ह्यातील आदिवासींच्या संदर्भात जे काही निष्कर्ष प्राप्त झाले आहेत. ते पुढीलप्रमाणे मांडण्यात आले आहे.

## निष्कर्ष : (Conclusion)

''परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सामाजिक-आर्थिक, स्थितीचे अध्ययन'' २००१-०२ ते २०१४-१५ या अभ्यासांच्या संदर्भात प्राप्त झालेले निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) आदिवासी जमातीना जंगली प्रदेश व डोंगरदऱ्यात आणि एकांकात राहणे आवडत असते.

२) आदिवासींना आधुनिक काळामध्ये 'वनवासी' या नावाने न ओळखता 'अनुसूचित जमाती' या नावाने ओळखले जाऊ लागले आहे.

३) आदिवासी हे स्वतः विषयी माहिती सांगण्यास आणि नवीन माहिती जाणून व समजून घेण्यास उत्साही नसल्याचे दिसून आले आहे.

४) आदिवासी लोकांना आदिवासी असल्याचा अभिमान असल्याचे स्पष्ट दिसून येते.

५) आदिवासीमध्ये जागृतता नसल्याचे दिसून येते. तसेच आदिवासी मनाने संकोच प्रवृत्ती, लाजाळूपणा व मितभाषिक असल्याचे दिसून आले आहे. तर शरीराने काटक, धाडसी आणि चपळ असल्याचे संशोधनाअंती निर्देशनास आले.

६) आदिवासी समाजात आर्थिक तसेच सामाजिक विषमता वाढत असल्याचे अभ्यास करताना आढळून आले आहे.

७) आदिवासी लोकांची अर्थव्यवस्था ही प्राथमिक स्वरूपाची असल्याचे पहावयास मिळते.

८) आदिवासी समाजाकडे उपजीविकेचे साधन कमी प्रमाणात आहे.

९) परभणी जिल्ह्यातील आधारभूत संरचना, पायाभूत सोयी सुविधांचा विकास मंद गतीने होताना दिसून येतो.

१०) महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यात आदिवासी लोकांची कमी अधिक प्रमाणात वस्ती असून राज्यातील जमातीची संख्या ४७ एवढी आहे.

११) इतर समाजाच्या संपर्कामुळे काही आदिवासी स्वतःला हिंदू म्हणून मानतात. तसेच कालांतराने आदिवासींचे हिंदूकरण होताना दिसून आले. असे असले तरी आदिवासींच्या प्रथा, परंपरा आचार-विचार, संस्कृती देखील भिन्न असल्याचे दिसून आले.

१२) निरनिराळ्या आदिवासींमध्ये उच्च निचतेची भावना दिसून येतो. त्याची रीतिरिवाज देखील भिन्न स्वरूपाची आहेत.

१३) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंब संयुक्त कुटुंब पद्धती आहे. आणि १९३ (५३.०६) आदिवासी कुटुंबात विभक्त कुटुंब पद्धती आहे. काळाच्या ओघात आदिवासी समाजातील कुटुंब पद्धतीचे विघटन होऊन विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण वाढत असल्याचे आढळून आले आहे.

१४) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांतील पुरूषांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, एकूण ५२० पुरूषापैकी साक्षर पुरूषांची टक्केवारी ४८.४७ टक्के आहे. तर निरक्षर पुरूषांची टक्केवारी ५१.३३ टक्के एवढी आहे. एकूण साक्षर व्यक्तीपैकी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या पुरूषांची टक्केवारी २२.७० टक्के, माध्यमिक शिक्षण घेतलेल्या पुरूषांची टक्केवारी १२.११ टक्के, उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या पुरूषांची टक्केवारी ७.११ टक्के, पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या पुरूषांची टक्केवारी ३.६५ टक्के, पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या पुरूषांची टक्केवारी १.९२ टक्के, व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या पुरूषांची टक्केवारी ४.९५ टक्के आणि अभियांत्रिकीचे शिक्षण एकाही पुरूषांने घेतलेले नाही.

१५) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, एकूण ५०९ स्त्रियापैकी साक्षर स्त्रियांची टक्केवारी २९.०८ टक्के आहे. तर ७०.९२ टक्के स्त्रिया निरक्षर आहेत. प्राथमिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या स्त्रियांची टक्केवारी १८.०८ टक्के, माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या स्त्रियांची टक्केवारी ७.४७ टक्के एवढी आहे. उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या स्त्रियांची टक्केवारी २.५६ टक्के, पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या स्त्रियांची टक्केवारी ०.४० टक्के पदव्युत्तर पर्यंत शिक्षण घेतलेल्या स्त्रियांची टक्केवारी ०.४० टक्के आहे. अभियांत्रिकीकापर्यंत शिक्षण एकाही स्त्रियांनी घेतलेला नाही यांचा अर्थ असा की, उच्च शिक्षणातील स्त्रियांचे प्रमाण कमी आहे असे केलेल्या अभ्यासावरून दिसून येतो.

१६) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, एकूण ८६१ मुलांपैकी साक्षर मुलांची टक्केवारी ९२.०८ टक्के असून निरक्षर मुलांची टक्केवारी ७.२० टक्के आहे. प्राथमिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलांची टक्केवारी ३७.६३ टक्के, माध्यमिक शिक्षण घेतलेल्या मुलांची टक्केवारी २७.५३ टक्के, उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या मुलांची टक्केवारी १३.३५ टक्के, पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलांची टक्केवारी ७.६९ टक्के, पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या मुलांची टक्केवारी ३.६० टक्के, व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या मुलांची टक्केवारी २.५६ टक्के, अभियांत्रिकीपर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलांची टक्केवारी ०.३४ टक्के एवढे आहे.

१७) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींच्या शैक्षणिक स्थितीच्या संदर्भात अभ्यास केला असता असे दिसून आले की, नमुना आदिवासी कुटुंबामध्ये ८५६ एवढ्या मुलींची संख्या आहे. त्यापैकी साक्षर मुलींची

टक्केवारी ८७.८६ टक्के असून निरक्षर मुलींची टक्केवारी १२.१४ टक्के एवढी आहे. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या मुलींची टक्केवारी ५३.२८ टक्के, माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलींची टक्केवारी २१.६१ टक्के, उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलींची टक्केवारी ८.४१ टक्के, पदवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलींची टक्केवारी ३.२८ टक्के, पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या मुलींची टक्केवारी ०.३६ टक्के, व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या मुलींची टक्केवारी ०.९३ टक्के, अभियांत्रिकीपर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलींची टक्केवारी शुन्य दिसून आली आहे.

१८) आदिवासी कुटुंबातील सर्वसाधारणपणे साक्षरतेचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, साक्षरतेची टक्केवारी ३८.७६ टक्के एवढी असून निरक्षरतेची टक्केवारी ६१.२२ टक्के एवढी आहे. एकूण साक्षरतेमध्ये पुरूषांची टक्केवारी ४८.४६ टक्के आणि महिलांची टक्केवारी २९.०७ टक्के एवढी आहे. निरक्षरतेमध्ये पुरूषांची टक्केवारी ५१.५३ टक्के आणि महिलांची टक्केवारी ७०.९२ एवढी आहे.

१९) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या गावात आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, एकूण ३६ नमुना गावांपैकी ९१.६६ टक्के गावात आरोग्यविषयक सुविधांचा अभाव असल्याचे आढळून आले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, अजूनही आदिवासी गावात आरोग्याच्या सोयी सुविधा पोहचलेल्या दिसून येत नाही.

२०) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी घरी प्रसूती झालेल्या महिलांच्या टक्केवारी २९.४४ टक्के एवढी आहे. तर ७०.५६ टक्के कुटुंबातील स्त्रियांची प्रसूती सरकारी दवाखान्यात झालेली आहे.

२१) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोक घेत असलेल्या औषधोपचाराचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, एकूण कुटुंबापैकी विविध आजारावर घरगुती उपचार करणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी १९.७२ टक्के, दवाखान्यात उपचार घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ६४.७२ टक्के एवढी आहे. यावरून असे लक्षात येते की, १५.५६टक्के कुटुंबांतील लोक अजूनही पारंपरिक वैदू किंवा मांत्रिकाकडून उपचार घेत असून ते आधुनिक उपचार पद्धतीचे फायदा घेत नाही.

२२) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील उत्तरदात्यापैकी तंबाखू आणि दारू व्यसनाची सवय असलेल्या कुटुंबाची टक्केवारी ४२.२५ टक्के आहे. विडी/ चिलीमचे व्यसन असलेल्या कुटुंबांची टक्केवारी २८.९२ टक्के आहे. तर २८.९१ टक्के कुटुंबांतील सदस्यांना संमिश्र आणि गुटख्याची सवय आहे असे आढळून आले आहे.

२३) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या गावातील पेयजल पुरवठा स्थितीचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, एकूण ३६ नमुना गावापैकी ८३.३३ टक्के एवढ्या गावात पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असून १६.६७ टक्के एवढ्या गावात पिण्याच्या पाण्याचे सुविधा उपलब्ध नाही.

२४) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या गावात उपलब्ध असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापैकी आठ महिने नळाद्वारे, बारा महिने सार्वजनिक विहिरीद्वारे आणि पाच महिने कुपनलिकाद्वारे पाणी पुरवठा होतो. नदीद्वारे पाणी पुरवठा होत नाही.

२५) नमुना म्हणून निवडलेल्या गावात पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ७२.२२ टक्के एवढी आहे. तर पिण्यासाठी

स्वच्छ पाणी न मिळणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २७.२८ टक्के एवढी आहे.

२६) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांच्या घरात उपलब्ध असलेल्या शौचालय विषयक सुविधांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, शौचालयाची सुविधा असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १२.२२ टक्के आहे. शौचालयाची सुविधा नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ८७.७८ टक्के एवढी आहे.

२७) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी ३२ आदिवासी कुटुंबानी वापरत असलेल्या शौचालयाची टक्केवारी ७२.७२ टक्के तर शौचालयाचा वापर करत नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २७.२८ टक्के एवढी आहे.

२८) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांच्या स्नानगृहाच्या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, स्नानगृह असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४०.८३ टक्के तर स्नानगृह नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ५९.१७ टक्के आहे. यावरून असे स्पष्ट होते की, आदिवासी कुटुंबात मोठ्या प्रमाणात स्नानगृह नसल्याचे दिसून आले आहे.

२९) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलाच्या विवाहाच्या वेळेचे वय या संबंधी अभ्यास केला असता असे दिसून आले की, १६ ते १८ वर्षी विवाह झालेल्या मुलींची संख्या ८२ असून त्याची टक्केवारी २२.७८ टक्के एवढी आहे. १८ ते २० या वर्षी विवाह झालेल्या मुलींची संख्या १९६ म्हणजेच ५४.४४ टक्के एवढी आहे. २० ते २२ या वर्षात विवाह झालेल्या मुलांची संख्या ६३ असून त्याची टक्केवारी १७.६ टक्के एवढी आहे. तसेच २२ ते २४ या वयोगटातील विवाह झालेल्या मुलांची संख्या १७ असून त्याची

टक्केवारी ४.७२ टक्के एवढी आहे. तर २५ वर्षाच्या पुढे विवाह झालेल्या मुलांची संख्या ०२ असून त्याची टक्केवारी ०.५५ टक्के एवढी आहे.

३०) मुलींच्या विवाहाच्या वयोगटासंबंधीत माहिती घेतली असता १४ ते १६ या वयोगटात विवाह आदिवासी कुटुंबातील संख्या ३०५ असून त्याची टक्केवारी ८४.७२ टक्के एवढी आहे. १६ ते १८ या वयोगटातील विवाह होणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ४६ असून त्याचे प्रमाण १२.७८ टक्के एवढी आहे. १८ ते २० या वयोगटात विवाह होणाऱ्या आदिवासी कुटुंबातील संख्या ०९ असून त्याचे टक्केवारी २.६ टक्के आहे. २० ते २२ या वर्षाच्या पुढे विवाह एकाही मुलीचे झालेले दिसून येत नाही. म्हणजेच आदिवासी समाजात विवाह लवकर करण्याची प्रथा आहे असे मत व्यक्त केले आहे.

३१) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील हुंडा पद्धती विषयी अभ्यास केला असता असे आढळून आले की, २६९ आदिवासी कुटुंबांनी विवाह प्रसंगी हुंडा दिला जातो किंवा घेतला जातो असे मत व्यक्त केले असून त्यांची टक्केवारी ७४.७२ टक्के एवढी आहे. तर ९१ आदिवासी कुटुंबांनी हुंडा दिला किंवा घेतला जात नाही असे मत व्यक्त केले असून त्याची टक्केवारी २५.२८ टक्के एवढी आहे. म्हणजेच आदिवासी समाजात हुंड्याचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे.

३२) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील मुलींना वारसा हक्क देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३.३३ टक्के एवढी आहे. तसेच मुलींना वारसा हक्क न देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ९८.८७ टक्के एवढी आहे.

३३) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांच्या पोशाखाविषयी अभ्यास केला असता असे दिसून आले की, पारंपरिक पोशाख

वापरणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २४.४४ टक्के असून पारंपरिक पोशाख न वापरणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ७५.५६ टक्के एवढी आहे.

३४) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील ८५ टक्के लोक देवाला नवस करताना आढळून आले. तर १५ टक्के आदिवासी कुटुंबातील लोक देवाला नवस करीत नाही असे अभ्यासात आढळून आले.

३५) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांचा देवावर असणाऱ्या श्रद्धांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, लोकांचा देवावर विश्वास असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ८५.५६ टक्के, देवावर कसलाही विश्वास नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १४.४४ टक्के एवढी आहे.

३६) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील मतदानाविषयी अभ्यास केला असता असे आढळून आले की, नियमित मतदान करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २६४ असून त्यांची टक्केवारी ७३.३३ टक्के एवढी आहे, तर कधी-कधी मतदान करणााऱ्या कुटुंबांची संख्या १६ असून त्यांची टक्केवारी ४.४४ टक्के एवढी आहे.

३७) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांनी गोंदण्याचा प्रथेच्या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, गोदवून घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २७.२२ टक्के, गोदवून न घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ७३.७८ टक्के एवढी आहे.

३८) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबाच्या निवासा संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, झोपडीमध्ये राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३.३३ टक्के, मातीचे बांधकाम असणाऱ्या घरात राहणाऱ्या

आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ७६.६७ टक्के, विटा पत्राच्या घरामध्ये राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १९.९४ टक्के आणि पक्क्या स्वरूपाच्या घरामध्ये राहणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी ३.०५ टक्के एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, माती बांधकाम असणााऱ्या घरामध्ये राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या अधिक आहे.

३९) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी ४४.४४ टक्के एवढ्या कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन असून ५५.५६ टक्के एवढ्या कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन नाही. म्हणजेच ५५.५६ टक्के एवढे कुटुंब भूमिहीन असल्याचे अभ्यासावरून स्पष्ट होते.

४०) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीच्या धारण क्षेत्राच्या आकारमानाचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, ०-५ एकर शेतजमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ८५ टक्के, ५-१० एकर शेतजमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ९.३८ टक्के, १०-१२ एकर शेतजमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ४.३८ टक्के, १२ एकर शेतजमीनीच्या पुढे असणााऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी १.२५ टक्के आहे. यावरून शेतजमीन कमी असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या जास्त दिसून येते.

४१) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांनी धारण केलेल्या शेतजमीनीपैकी ३० टक्के जमीन ही सिंचनाखाली आहे. तर सिंचनाखाली शेतजमीन नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ७० टक्के एवढी आहे.

४२) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबाकडील शेतीच्या सिंचनाच्या स्वरूपा संबंधी अभ्यास केला असता असे आढळून आले की, हंगामी स्वरूपाचे सिंचनाचे साधने असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ७७.०९ टक्के

एवढी आहे. बारामाही स्वरूपाच्या सिंचनाचे साधने असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी २२.९१ टक्के एवढी आहे.

४३) एकूण नमुना आदिवासी कुटुंबातील व्यवसाय करणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी २१.९४ टक्के आहे. मजुरी करणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी २१.४७ टक्के एवढी आहे. शेती आणि मजुरी करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २२.५ टक्के एवढी आहे. आणि नोकरी न करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३.०६ टक्के एवढी आहे. तर व्यवसाय करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४.७२ टक्के एवढी आहे. यावरून मजुरी करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या अधिक दिसून येते.

४४) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, शुन्य ते तीन हजार रू. मासिक उपभोग खर्च असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी २१.११ टक्के, तीन हजार ते पाच हजार रूपये मासिक उपभोग खर्च असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ३६.११ टक्के, पाच हजार ते सात हजार मासिक उपभोग खर्च असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी १४.४४ टक्के, सात हजार ते नऊ हजार मासिक उपभोग खर्च असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ११.९४ टक्के नऊ हजार ते अकरा हजार मासिक उपभोग खर्च असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ७.७८ टक्के, अकरा हजार ते तेरा हजार मासिक उपभोग खर्च असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ५.८३ टक्के आणि तेरा हजार ३ पेक्षा जास्त मासिक उपभोग खर्च असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी २.७७ टक्के एवढी आहे. म्हणून सी रंगराजन समितीच्या निकषानुसार ५७.२२ टक्के आदिवासी कुटुंबे ही दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे.

४५) नमुना म्हणून निवडलेल्या परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी उपभोग खर्च या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, अन्नधान्यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी १४.२२ टक्के, खाद्यतेल यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ४.६७ टक्के, पेयजल पदार्थ व चहा यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी २.०३ टक्के, भाजीपाला यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ५.२५ टक्के, मास, मटन, अंडे यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ८.२६ टक्के, तंबाखू जन्य पदार्थ यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ५.२५ टक्के, मादक पदार्थ यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ५.२९ टक्के, सरपण, वीज, रॉकेल यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी २.९८ टक्के, कपडे व अंथरून यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ६.१२ टक्के, पादत्राणे यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी १.७२ टक्के, शिक्षण यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी २.९० टक्के, वैद्यकीय सेवा यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी १.१२ टक्के, करमणूक यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ०.८३ टक्के, मोबाईल यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ३.७५ टक्के दागिणे यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी प्रवासावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी २.२४ टक्के, दुग्ध व दुधाचे पदार्थ यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी १.७४ टक्के, स्वयंपाक घरातील भांडे यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ३.९० टक्के, न्याहारी यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी १.९५ टक्के, स्नानगृहातील वस्तू यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी १.०२ टक्के, दळणवळणावरील खर्चावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी ५.२० टक्के, मसाले यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी २.८४ टक्के, नाष्टा यावर केल्या जाणाऱ्या खर्चाची टक्केवारी २.४७ टक्के इत्यादी दिसून येतात.

४६) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांची चैनीच्या वस्तूच्या उपभोग घेणाऱ्या आदिवासी कुटुंबाचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, कुलर असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४.४४ टक्के, टि.व्ही. असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ९.७२ टक्के, सायकल असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ८.३३ टक्के, शिलाई मशीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ५.२८ टक्के, मोबाईल असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ९६.३८ टक्के, मिक्सर असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी १५.५६ टक्के, कपाट (लाकडी/लोखंडी) असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ६.११ टक्के, रेडिओ असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ८.०५ टक्के, खूर्च्या (लाकडी / लोखंडी) असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ६.११ टक्के, मोटार सायकल असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३.३३ टक्के, पंखा, फॅन, असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ७.११ टक्के, बैलगाडी असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी २४.१६ टक्के, गॅस, शेगडी व स्टोव्ह असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ६.११ टक्के, टेबल असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४.७२ टक्के, घड्याळ असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३३.३३ टक्के, फ्रिज असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २.५ टक्के आहे. यावरून चैनीच्या वस्तूचा वापर कमी प्रमाणात दिसून येतो.

४७) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबाच्या उत्पन्नातून वार्षिक खर्च भागविणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३८.३३ टक्के एवढी आहे. तर उत्पन्नातून वार्षिक खर्च न भागण्याऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ६१.६६ टक्के एवढी आहे. यावरून ६१.६६ टक्के आदिवासी कुटुंबाचा उदरनिर्वाह स्वतःच्या उत्पन्नातून होत नाही. म्हणून त्यांना कर्ज घ्यावे लागते.

४८) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांनी घेतलेल्या कर्जाच्या स्थितीचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, कर्ज घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ६१.६७ टक्के आहे. तर कर्ज न घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३८.३३ टक्के एवढी आहे.

४९) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांनी कर्ज कोणत्या कारणासाठी घेतला आहे. या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, उदरनिर्वाहासाठी कर्ज घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३५.१३ टक्के, विवाहकरिता कर्ज घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १४.४१ टक्के, शेती करण्याकरिता कर्ज घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २८.३८ टक्के, दवाखाना व इतर कामासाठी कर्ज घेणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी १८.१९ टक्के आहे तसेच शिक्षणासाठी कर्ज घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३.१६ टक्के आहे. यावरून असे स्पष्ट होते की उदरनिर्वाह करण्यासाठी आदिवासी कुटुंबाना मोठ्या प्रमाणात कर्ज घ्यावे लागते.

५०) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, काढून खर्च करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ६१.६७ टक्के आहे, त्यापैकी सावकाराकडून कर्ज घेऊन खर्च करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३९.१९ टक्के, नातेवाईक यांच्याकडून कर्ज घेऊन खर्च करणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी १२.१७ टक्के, उसनवारीकरून खर्च करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १२.१७ टक्के, मित्र यांच्याकडून कर्ज घेऊन खर्च करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १६.२१ टक्के एवढी आहे.

५१) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील ५६.११ टक्के कुटुंबाकडे रेशनकार्ड आहेत. त्यापैकी बी.पी.ए. पिवळा रेशनकार्ड असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४५ टक्के एवढी आहे. ए.पी.एल. केशरी रेशनकार्ड असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४.१७ टक्के एवढी आहे. अंत्योदय रेशनकार्ड असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ६.९४ टक्के एवढी आहे. म्हणजेच बी.पी.एल रेशनकार्ड असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी अधिक आहे.

५२) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांचे बँकेमध्ये असणाऱ्या खाते संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले, बँकेमध्ये खाते असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ७३.६१ टक्के आहे. तर बँकेमध्ये खाते नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २६.३९ टक्के एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, २६.३९ टक्के नमुना आदिवासी कुटुंबाला बॅकिंग सेवेचा लाभ झालेला नाही.

५३) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांतील स्थलांतराच्या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, स्थलांतरित होणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ६२.०५ टक्के असून स्थलांतरित न होणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३७.०५ टक्के एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, स्थलांतरित होणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या अधिक दिसून येते.

५४) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांचा उत्पन्न गटानुसार अभ्यास केला असता असे दिसून आले की, १०-३० हजार रूपये पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १२.२२ टक्के, ३०-६० हजार रू. वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ५६.६६ टक्के एवढी आहे. ६०-९० हजार वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी

कुटुंबांची टक्केवारी २१११ टक्के एवढी आहे. ९० हजार ते १ लाख २० हजार रूपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ५ टक्के आहे. तर १ लाख २० हजार ते १ लाख ५० हजार रूपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ३.३३ टक्के आहे. तर १ लाख ५० हजार रूपयापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १.६६ टक्के आहे. म्हणजेच ३०-६० हजार रूपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या अधिक आहे.

५५) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांना शासकीय योजनाच्या माहिती संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, योजनेची माहिती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ५८.३३ टक्के तर योजनेची माहिती नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४१.६७ टक्के एवढी आहे. यावरून ४१.६७ आदिवासी कुटुंबांना शासकीय योजना संदर्भात माहिती नाही.

५६) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांतील लोकांना योजनेची माहिती कोणाकडून मिळाली. या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, सरपंच यांच्याकडून योजनेची माहिती मिळणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १६.६७ टक्के एवढी आहे. तलाठी यांच्याकडून योजनेची माहिती मिळविणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १८.५८ टक्के एवढी आहे. ग्रामसेवक यांच्याकडून योजनेची माहिती मिळविणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४६.२० टक्के एवढी आहे. तर नातेवाईक यांच्याकडून योजनेची माहिती मिळविणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी १३.८० टक्के एवढी आहे. तर इतर यांच्याकडून योजनेची माहिती मिळणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४.७७ टक्के एवढी आहे.

५७) एकूण नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांनी योजना मंजुर करण्यासाठी दिलेली दलाली या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, योजना मंजुरी करिता दिलेल्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ४८.१० टक्के एवढी आहे. तर दलाली न देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी २५.९० टक्के एवढी आहे. यावरून योजनेचा लाभ घेताना मध्यस्त लोकांना दलाली घ्यावी लागते हे स्पष्ट होते.

५८) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबाला आदिवासी विकास विभागाच्या योजना संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, आदिवासी विकास विभागाच्या योजनामध्ये समाविष्ठ असलेल्या एकूण ७ योजनापैकी आदर्श आश्रम शाळा यास पात्र लाभार्थ्याची विद्यार्थ्यांची टक्केवारी ७.३८ टक्के एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा पात्र लाभार्थीची टक्केवारी १७.९२ टक्के, आदिवासी पांरपरिक नृत्य स्पर्धा पात्र लाभार्थीला टक्केवारी १७.३४ टक्के, आदिवासी हस्त कला प्रदर्शन लाभार्थीची टक्केवारी ३३.३३ टक्के, परदेशाात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती लाभार्थीची टक्केवारी एकही आदिवासी मुलांना लाभ घेतलेला नाही. आदिवासी सेवक राज्य पुरस्कार पात्र लाभार्थींची टक्केवारी शुन्य दिसून आले आहे. यावरून आदिवासी विभागामार्फत राबवत असलेल्या योजना आदिवासींना कमी प्रमाणात मिळते.

५९) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबाला महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळच्या योजना संदर्भात असे आढळून आले की, खावटी कर्ज योजनेस पात्र लाभार्थीची टक्केवारी १६ टक्के, सारथी ऑटोरिक्षा योजना लाभार्थीची टक्केवारी ३.५६ टक्के, फोटो स्टॅन्ड योजनास पात्र लाभार्थीची टक्केवारी ३.१२ टक्के, टेम्पो ट्रॅक्टर, टॅक्सी इ. योजनेसाठी लाभार्थीची टक्केवारी ८.३३ टक्के, एकाधिकार धान्य खरेदी योजना लाभार्थीची टक्केवारी शुन्य दिसून आले आहेत.

६०) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील पीक आणि संवर्धन विकासाच्या योजना या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकरी कुटुंबांचे उत्पादन वाढविण्याच्या उद्देशाने आर्थिक साह्य देणारी योजनेस पात्र लाभार्थींची टक्केवारी २२.६५ टक्के, आदिवासी मुलांना शेतीविषयक व शेतीची अवजारे दुरूस्तीचे प्रशिक्षण पात्र लाभार्थींची टक्केवारी २.२८ टक्के, रासायनिक खते याावर अर्थसहाय्य झालेल्या पात्र लाभार्थींची टक्केवारी २.५९ टक्के एवढी आहे. यावरून असे आढळून आले की, पीक संवर्धन विकासाच्या योजना अजूनही आदिवासी पर्यंत पोहचलेल्या नाहीत.

६१) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंब समाज कल्याण विभागाच्या योजनाच्या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, माध्यमिक शाळामध्ये शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पात्र लाभार्थींची टक्केवारी ९४.४१ टक्के, आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क पात्र लाभार्थ्यांची टक्केवारी १०० टक्के एवढे आहे. विद्युत पंप ते तेलपंप इंजिनाचा पुरवठा या योजनेच्या पात्र लाभार्थींची टक्केवारी १५.०६ टक्के ७ वी ८ वी पर्यंत शारीरिकदृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांना राज्य शिष्यवृत्ती योजनेस पात्र लाभार्थींची टक्केवारी १०० टक्के आहे. या संदर्भात समाज कल्याणच्या योजना आदिवासींना अधिक प्रमाणात मिळालेल्या नाहीत.

६२) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबाना आरोग्य विभागाच्या योजना संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, राष्ट्रीय हिवताप निर्मुलन योजना करिता पात्र लाभार्थींची टक्केवारी शुन्य आहे. नारू या योजनेस एकही कुटुंब पात्र नसून लाभार्थींची टक्केवारी शुन्य आहे.

६३) नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबाना इतर योजनाच्या संदर्भात अभ्यास केला असता असे आढळून आले की, तुषार व ठिबक या योजनेकरिता पात्र लाभार्थीची टक्केवारी १५.०६ टक्के आहे. पंतप्रधान सुशिक्षित बेरोजगार तरूणांसाठी रोजगार योजना या करिता पात्र लाभार्थीची टक्केवारी ५.१२ टक्के, सुशिक्षित बेरोजगारासाठी प्रशिक्षण कार्यक्रम योजनाकरिता पात्र लाभार्थीची टकेवारी शुन्य आहे. सुशिक्षत बेरोजगारासाठी बीज भांडवल अर्थसहाय्य योजना पात्र लाभार्थीची टक्केवारी ०.५ टक्के, नव संजीवन योजनाची लाभार्थीची टक्केवारी २.६८ टक्के, फळबाग विकास योजना या योजनाकरिता लाभार्थीची टक्केवारी ५.६२ टक्के, गॅस युनिट पुरवठा योजना या योजनाकरिता लाभार्थीची टक्केवारी ९.२५ टक्के, विद्यार्थी अपघात योजना या योजने करिता लाभार्थीची टक्केवारी ५० टक्के, सैन्य तथा पोलिस दल भरतीपूर्वक प्रशिक्षण या योजनाकरिता लाभार्थीची टक्केवारी १६ टक्के, मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना करिता पात्र लाभार्थीची टक्केवारी २८.५७ टक्के, राजीव गांधी राष्ट्रीय फेलोशिप या योजनाकरिता पात्र लाभार्थीची टक्केवारी १०० टक्के आहेत.

**धोरणात्मक उपाय :**

परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी समाजातील कुटुंबांचे अध्ययन केले असता असे आढळून आले की, आदिवासी समाज सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला आहे. आदिवासी समाज प्रामुख्याने दऱ्याखोऱ्यात जंगलात राहणारी एक जमात आहे. या समाजाचे सामाजिक व आर्थिक परिस्थितीच्या अभ्यासावरून जे निष्कर्ष मांडण्यात आले आहे. त्या आधारे या समाजाची आर्थिक, सामाजिक अडचण दूर करण्यासाठी व त्यांचा विकास व्हावा या हेतूने काही शिफारशी सुचविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहे.

१) आदिवासी समाजातील मुला-मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक दिसून आले आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रमाणात वाढ व्हावी तसेच शैक्षणिक गळतीचे प्रमाण थांबावे म्हणून शाळेच्या वस्तीगृहाच्या सोयी सुविधामध्ये तसेच मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेत शासनाने अधिक प्रमाणात वाढ करण्यात यावी.

२) आदिवासी समाजातील लोकांनी अंधश्रद्धा, रूढी परंपरा देवभोळेपणा या अनेक प्रथांचा समाजातून दूर करावे. तसेच आजच्या या आधुनिक युगात वैज्ञानिक दृष्टीकोणाचा स्वीकार करावा आणि आपल्या विकास साधनाचा प्रयत्न करावा.

३) आदिवासी समाजकरिता असलेल्या सरकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचावी. यासाठी अभियान, कार्यशाळा, तालुका स्तरावर, गावस्तरावर राबवून समाजाला सरकारी योजना बाबत माहिती द्यावी. जेणेकरून त्यांना योजनेची माहिती होईल.

४) आदिवासी समाजातील प्रत्येक कुटुंबाना शासनाने घर बांधून द्यावे. जेणे करून त्यांचा राहण्याचा प्रश्न सुटेल.

५) सरकार आदिवासींच्या विकासासाठी जेवढा निधी उपलब्ध करून दिला जातो. त्याचा परिपूर्ण वापर आदिवासी समाजासाठी होत नाही. शिल्लक राहिलेला निधी परस्पर इतर खात्याकडे वळविले जाते. हा आदिवासींच्या विकासावर होणारा अतिक्रमण थांबवावे व शिल्लक राहिलेला निधीचा स्वतंत्रपणे आदिवासी विकास निधीत समावेश करून त्यांचा आदिवासींच्या कल्याणाकरिता वापर करावा.

६) परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजामध्ये व्यवसाय व स्वयंरोजगार करणाऱ्याचे प्रमाण कमी दिसून आले. या करिता शासनाने व्यावसायिक

शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यात यावी तसेच व्यावसायिक स्वयंरोजगार निर्माण होण्यास त्यांना प्रोत्साहन द्यावे.

७) आदिवासी समाजाला दारिद्र्याची लागलेली किड नष्ट करण्यासाठी या समाजातील लोकांना लघुउद्योग, कुटीर उद्योग व व्यवसायाचे मार्गदर्शन व प्रशिक्षणाची सोय करावी तसेच त्यांना या उद्योगाकरिता, कर्ज मिळविण्यासाठी मदत करावी.

८) आदिवासी समाजातील स्त्री-पुरूष साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी, स्त्री-पुरूषांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहिम राबविण्यात यावी.

९) आदिवासी समाजात भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण अधिक दिसून येते. त्यामुळे शासनाच्या ताब्यातील गायरान जमिनीचे भूमिहीन कुटुंबांमध्ये वाटप करण्यात यावे. जेणेकरून आदिवासींना योग्य प्रकारे न्याय मिळू शकेल.

१०) परभणी जिल्ह्यातील निवडक आदिवासी गावातील पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी शासनाकडून अधिक प्रमाणात प्रयत्न करावे. जेणेकरून नळ योजना गावापासून घरापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

११) आदिवासी समाज हा व्यसनाधिनतेने ग्रासलेले आहे. त्याामुळे त्यांच्या गावात जावून सामाजिक प्रबोधनाद्वारे जनजागृती करावी. जेणेकरून त्यांची व्यसनातून सुटका होईल आणि आरोग्य सुधारेल तसेच व्यसनावर होणारा खर्च कमी होईल.

१२) आजच्या वैज्ञानिक युगामध्ये सुद्धा आदिवासी समाजाचा पारंपरिक उपचार पद्धतीवर अधिक भर असलेला दिसून येतो. या करिता त्यांना गावातच

दवाखान्याच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देवून त्यांना दवाखान्याचा लाभ घेण्यासाठी आर्थिक मदत करावी.

१३) रेशनकार्ड नसलेल्या आदिवासी कुटुंबांना अंत्योदय रेशनकार्डचे वाटप करून वेळेवर धान्य वाटप करावे.

१४) आदिवासी समाजातील प्रत्येक कुटुंबांना शौचालयाचे महत्त्व पटवून देवून त्यांना शौचालय बांधून देण्यात यावे.

१५) आदिवासी समाजातील लोकांकडून कोणत्याही स्वरूपाचे तारण न घेता बिन व्याजी कर्ज उपलब्ध करून द्यावे. जेणेकरून त्यांचा राहणीमान वाढण्यास मदत होईल.

१६) आदिवासींच्या प्रत्येक गावामध्ये बारा ही महिने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे स्रोत उपलब्ध करावे. जेणेकरून त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल.

१७) आदिवासी समाजातील बहुसंख्य कुटुंब ही दारिद्र्य रेषेखाली निकृष्ट प्रतीचे जीवन जगत आहे. त्यांच्या प्रश्नाचे मूळ आर्थिक दुरावस्थेत आहेत. तेव्हा त्यांची आर्थिक सुधारणा केल्याशिवाय खरा प्रश्न सुटणार नाही. याकरिता महाराष्ट्र शासनाने आदिवासी समाजाच्या पुनर्वसनासाठी आर्थिक तरतुद करावी. बेरोजगार तरूणांना उद्योग समुहांनी रोजगार पुरवावा यासाठी शासनाने त्यांच्यावर दबाव आणून तरूणांना जास्तीत जास्त रोजगार पुरवावा.

१८) आदिवासी समाजातील लोकांना शासकीय योजना बाबत अजूनही जाणीव जागृती आणि योजनाप्रती उदासिनता दिसून येते. त्यामुळे शासनाने योजनाचा प्रसार आणि प्रचारासोबत काटेकोरपणे अंमलबजावणी आणि गरजुवंताना लाभ कसा होईल. याकडे प्रत्यक्ष लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

१९) हुंडा प्रथा आदिवासी समाजाला अधः पतनाच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न करताना दिसून आला आहे. त्यामुळे हुंड्यासारखी असलेली वाईट प्रथा समाजातून नष्ट

होण्याकरिता लोक जागृतीची आवश्यकता आहे. हुंडा देणे किंवा घेणे हा सामाजिक गुन्हा समजण्यात यावा आणि त्यावर कठोर कार्यवाही करावी.

२०) अंधश्रद्धेमुळे अनेक स्त्रिया व मुले उपचारा अभावी रोगाना बळी पडतात, म्हणून अशा अंधश्रद्धा निर्मूलनासाठी सरकारने आदिवासी वस्त्याामध्ये अंधश्रद्धा निर्मुलन कार्यक्रमास प्रोत्साहित करावे.

२१) आदिवासींच्या वस्त्यामध्ये पैसे देवून सुद्धा डॉक्टर किंवा पारिचारिक येत नसल्यााचे दिसून येते. ही वस्तुस्थिती बदलण्यासाठी आदिवासी समाजातील अल्पशिक्षित किंवा सुशिक्षित मुलींना दाईकाम, प्रथमोपचार पारिचारिकाचे काम याा गोष्टीचे प्रशिक्षण देण्यात यावे व त्यांना आरोग्यदूत म्हणून त्यांच्या वस्त्यामध्ये पुरेशा पगारावर नेमणूक करावी तसेच आदिवासी गावात सरकारी दवाखान्याची उपकेंद्रे सुरू करावीत.

२२) मराठवाड्यामध्ये होणाऱ्या सलग तीन वर्षापासून दुष्काळ स्थिती असल्यामुळे मुला-मुलींचे शिक्षण तसेच विवाह आणि संसाराचा दैनंदिन खर्च करता भागवायचा अशा प्रश्न आदिवासी समाजासमोर उपस्थित झाला आहे. यावर उपाय म्हणून शासनाने मुला मुलींच्या शिक्षण फी माफ करावी. सवलतीच्या दराने शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करून द्यावे. सामुहिक विवाह सोळ्यास प्राधान्य द्यावे तसेच लोकांच्या उपजीविकेसाठी रोजगाराची साधने उपलब्ध करून द्यावीत.

२३) आदिवासींचे स्थलांतरित होण्यावर लक्ष केंद्रित करावे. जेणेकरून त्यांच्या मुलाबाळाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले जाईल.

२४) आदिवासींना बचत करण्यास प्रोत्साहन द्यावे. जेणेकरून बचत करून त्याचे भविष्य चांगल्या प्रकारे जगवू शकेल.

२५) शासकीय योजना आदिवासीपर्यंत पोहचण्यासाठी एका सरकारी व्यक्तीची नेमणूक करावी. आणि योजनांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे कशी होईल याकडे लक्ष पुरवावे.

२६) आदिवासी समाजात मजुरी करणाऱ्याचे प्रमाण अधिक आहेत. त्यामुळे त्यांच्या मजुरीमध्ये अधिक प्रमाणात वाढ करावी. तसेच रोजगार हमी योजनेत वाढ करून आदिवासी कुटुंबाना बाराही महिने काम मिळेल अशी व्यवस्था करावी.

२७) आदिवासींना लागणारे अन्नधान्य हे स्वस्त धान्य दुकानामार्फत कमी किंमतीत पुरविण्यात यावे.०

**गृहीतकृत्याची पडताळणी :**

**१) परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.**

परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्याास करताना नमुना आदिवासी कुटुंबातील शिक्षणाचे प्रमाण कमी आहे अशी शुन्य परिकल्पना मांडण्यात आली होती. ३६० नमुना आदिवासी कुटुंबाच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, नमुना आदिवासी कुटुंबातील शिक्षणाची टक्केवारी ३८.७६ टक्के एवढी आहे हे तक्ता क्र. ४.६ वरून स्पष्ट होते. म्हणजेच नमुना ३६० आदिवासी कुटुंबातील शिक्षणाचे प्रमाण कमी आहे हे गृहीतके सिद्ध होते.

**२) परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजासाठी उपलब्ध असलेल्या पेयजल सुविधांचा अभाव आहे.**

परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील सामाजिक स्थितीचा अभ्यास करताना जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबासाठी उपलब्ध असलेल्या पेयजल सुविधांचा अभाव आहे. अशी शुन्य परिकल्पना मांडण्यात आली होती. परभणी जिल्ह्यातील ३६० नमुना आदिवासी गावातील पेयजल सुविधांचा अभ्यास केला

असता तक्ता क्रमांक ४.१३ वरून असे स्पष्ट होते की, पेयजल सुविधांची उपलब्धता असलेल्या गावांची संख्या ३० (८३.३३ टक्के आहे) आणि पेयजल सुविधा उपलब्ध नसलेल्या गावाची संख्या ०६ (१६.६७ टक्के) एवढी आहे. यावरून हे सिद्ध होते की, नमुना आदिवासी कुटुंबासाठी उपलब्ध पेयजल सुविधाचा अभाव आहे. ही शुन्य परिकल्पना सिद्ध होत नाही.

**३) परभणी जिल्ह्यातील आदिवासी गावात आरोग्य विषयक सुविधांची कमतरता आहे.**

परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास करताना जिल्ह्यातील नमुना आदिवासी गावात आरोग्य विषयक सुविधांची कमतरता आहे. अशी शुन्य परिकल्पना मांडण्यात आली होती. जिल्ह्यातील एकूण ३६ नमुना आदिवासी गावातील आरोग्य विषयक सुविधाचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, एकूण नमुना ३६ गावापैकी केवळ ०३ (८.३३ टक्के) गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध आहे. आणि उर्वरित गावात आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध नाही. हे तक्ता क्रमांक ४.८ वरून स्पष्ट होते. म्हणजेच परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी गावात आरोग्यविषयक सुविधांचा कमतरता आहे. ही शुन्य परिकल्पना सिद्ध होते.

**४) परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाकडे शौचालय विषयक सुविधा कमी प्रमाणात आहे.**

परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करताना जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाकडे शौचालय विषयक सुविधा कमी प्रमाणात आहे. अशी शुन्य परिकल्पना मांडली होती. परभणी जिल्ह्यातील नमुना ३६० आदिवासी कुटुंबाचा अभ्यास केला असे आढळून आले की, शौचालय सुविधा उपलब्ध असणाऱ्या कुटुंबाची संख्या ४४ (१२.२२ टक्के) एवढी असून शौचालय

सुविधा उपलब्ध नसणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या ३१६ (८७.७८) एवढी आहे. हे तक्ता क्रमांक ४.१५ वरून अधिक स्पष्ट होते. म्हणजेच नमुना आदिवासी कुटुंबाकडे शौचालय सुविधांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. हे गृहीतक सिद्ध होते.

**५) परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजात दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे.**

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना नमुना आदिवासी कुटुंबातील दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. अशी शुन्य परिकल्पना मांडली होती. परभणी जिल्ह्यातील अशी शुन्य परिकल्पना मांडली होती. परभणी जिल्ह्यातील नमुना ३६० आदिवासी कुटुंबाच्या सी. रंगराजन समितीच्या निकषाच्या साह्याने अभ्यास केला असता नमुना आदिवासी कुटुंबातील २०६ (५७.७२ टक्के) कुटुंबाचा मासिक उपभोग खर्च हा कमी आहे. म्हणजेच ही कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे. हे तक्ता क्रमांक ५.३३ वरून स्पष्ट होते. म्हणजेच परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजास दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. ही शुन्य परिकल्पना सिद्ध होते.

**६) परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे.**

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना नमुना आदिवासी कुटुंबाचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे. अशी शुन्य परिकल्पना मांडलेली होती. परभणी जिह्यातील नमुना ३६० आदिवासी कुटुंबाच्या राहणीमानाचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, आवश्यक व परिपोषक आणि चैनीच्या वस्तुच्या उपभोगापासून वंचित असलेली जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाची संख्या जास्त आहे. हे तक्ता क्र. ५.४३ आणि ५.४४ वरून अधिक स्पष्ट होते. म्हणजेच नमुना आदिवासी कुटुंबाचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे. ही शुन्य परिकल्पना सिद्ध होते.

**७) परभणी जिल्ह्यातील आदिवासी लोकांना शासकीय योजनांचा लाभ हा कमी प्रमाणात झालेला आहे.**

परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाला झालेल्या शासकीय योजनांच्या लाभविषयक स्थितीचा अभ्यास करताना जिल्ह्यातील आदिवासी लोकांना शासकीय योजनांचा लाभ हा कमी प्रमाणात झालेला आहे. अशी शुन्य परिकल्पना मांडली होती. परभणी जिल्ह्यातील नमुना ३६० नमुना आदिवासी कुटुंबाच्या शासकीय लाभ विषयक स्थितीची पाहणी केली असता एकूण नमुना आदिवासी कुटुंबाना विविध शासकीय योजनाचा लाभ कमी प्रमाणात झालेला आहे. म्हणजेच जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील लोकांना शासकीय योजनांचा लाभ हा कमी प्रमाणाात झाला आहे ही शुन्य परिकल्पना सिद्ध होते.